**BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION**
**PUBLIC HEALTH DEVELOPMENT**
**INSECTICIDE BRANCH**
**Pest Control Officer, 1st Floor, Windsor BMC Library Building, Windsor Lane, CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai-400098**

No. : PCO/HE/ 633 /SR Dt. 30.09.2025

# NOTICE

Applications are invited from registered Sahakari / Berojgar Seva Sahakari Sansthas, which are registered under the Maharashtra Co-Op. Society Act. 1960 (whose motto is to provide jobs to unemployed persons) for providing 43 Volunteers for Insecticidal treatment at Building Construction sites for the period of 05 Months in H/East ward.

Interested Sansthas should download applications on B.M.C. portal http://portal.mcgm.gov.in or contact at the office of the Pest Control Officer, Office address: The Pest Control Office H/East Ward Office, 1st Floor, Windsor BMC Library Building, Windsor Lane, CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai-400098

The last date for submission of applications at the office of Pest Control Officer is Dt. 09.10.2025 before 02.00 P.M. on working days.

**Sd/-**

**Pest Control Officer - H/East Ward**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कीटक नियंत्रण एच विभाग पुर्व/कार्यालय

**<u>पहिला मजला, बीएमसी लायब्ररी बिल्डिंग, विंडसर लेन, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ (पु), मुंबई ४०००९८.</u>**

क्रमांक : की.नि.अ./एच-पूर्व/ ६३३ /एस.आर. दिनांक : ३०.०९.२०२५

## सूचनापत्र

-----------

कीटक नियंत्रण अधिकारी एच-पूर्व विभाग येथे बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता ०५ महिन्यांच्या कालावधीसाठी ४३ स्वयंसेवक मलेरिया/डेंगी/ चिकुनगुनिया/लेप्टोस्पारोसिस/प्लेग नियंत्रणाकरीता उपलब्ध करण्यासाठी, नोंदणीकृत सहकारी / बेरोजगार सेवा सहकारी संस्था दि. महाराष्ट्र को-ऑप सोसा. १९६० कायद्याने स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था (ज्या संस्थेचा उद्देश रोजगार मिळवणे आहे.) यांचेकडून अर्ज मागविण्याबाबत संकेत स्थळावर सूचनापत्र देण्यात येत आहे. औद्योगिक उत्पादक संस्था ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर अथवा किटक नियंत्रण एच-पूर्व विभाग कार्यालय कार्यालयीन पत्ता : किटक नियंत्रण कार्यालय, एच/पूर्व विभाग, पहिला मजला, बीएमसी लायब्ररी बिल्डिंग, विंडसर लेन, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ (पु), मुंबई ४०००९८. येथे संपर्क साधावा.

संस्थेने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी किटक नियंत्रण अधिकारी एच-पूर्व विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दिनांक ०९.१०.२०२५ रोजी ०२.०० दुपारी वाजेपर्यंत.

**सही/-**

कीटक नियंत्रण अधिकारी एच/पूर्व विभाग

## परिशिष्ट ‘अ’

**कीटक नियंत्रण अधिकारी विभागात अळीनाशक फवारणीकरिता**
**०५ महिन्यांकरिता व डेंगी व मलेरिया नियंत्रणाकरीता कंत्राट रक्कम**
**परिपत्रक क्र.प्रकाअ/०२ दि. २३.०४.२०२५ अन्वये रु. ७९२.३० प्रतिदिन प्रति स्वयंसेवक**

| अनु. क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी | स्वयंसेवकांची संख्या | एकूण कंत्राट रक्कम ( प्रतिदिन प्रतिस्वयंसेवक दर रू. ७९२.३० x ४३ स्वयंसेवक संख्या x १२१ मनुष्य दिवस ) (रु.) | एकूण कंत्राट रक्कमेच्या ४९.५८% लेव्ही (रू.) | एकूण कंत्राट रक्कम (रु.) ४९.५८ % लेव्हीसहीत ५% संभाव्य वाढीसह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कीटक नियंत्रण अधिकारी एच/पूर्वविभागात विभागातील मलेरिया/डेंगी/ चिकुनगुनिया/लेप्टोस्पारोसिस/प्लेग/उलटी-जुलाब इत्यादी आजार पसरविणा-या दिशकांचा (Vector) प्रसार न होण्याकरिता योग्य त्या उपाययोजना राबविण्याकरिता | दि. ०१/११/२०२५ ते ३१/०३/२०२६ पर्यंत (५ महिने) किंवा कार्यदिश दिल्याच्या दिनांकापासून पुढील १२२ दिवस | ४३ | **४१,२२,३४९/-** | **२०,४३,८६१/-** | **६४,७४,५२१/-** |

**कीटक नियंत्रण अधिकारी**
**एच/पूर्व विभाग**

## **परिशिष्ट 'ब'**

## **कामाचे साहित्य**

| **व्याप्ती /परिक्षेत्र** | **मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ए ते टी विभाग** |
| --- | --- |
| अर्जदार संस्थेने मनुष्यबळासोबत पुरवावयाची आवश्यक उपकरणे | • गॅलव्हनाइज्ड बादली (१० लिटर क्षमतेचे)<br>• मॉप (बोथा) |
| अर्जदार संस्थेने मनुष्यबळासोबत पुरवावयाची आवश्यक सुरक्षा साधने | • सेफ्टी शूज<br>• फेस मास्क<br>• हेलमेट<br>• गणवेश<br>• पंप |

**सही/-**
**कीटक नियंत्रण अधिकारी**
**एच/पूर्व विभाग**

## सूचनेच्या अर्जाचा नमुना

## परिशिष्ट ‘क’

**(अर्जदार संस्थेने आपल्या मुखपत्रावर (Letter Head) मूळ प्रतीत सादर करावा.)**

**प्रति,**
**कीटक नियंत्रण कार्यालय, पहिला मजला,**
**बीएमसी लायब्ररी बिल्डिंग, विंडसर लेन,**
**सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ (पु),**
**मुंबई ४०००९८.**

विषय : कीटक नियंत्रण ‘एच/पूर्व’ विभागात विविध प्रकारची कामे जसे की
अळीनाशक फवारणी, धुम्रफवारणी, मक्षिका नियंत्रण, मुषक नियंत्रण
इत्यादी
प्रकारची कामे दि. ०१/११/२०२५ ते ३१/०३/२०२६ पर्यंत (५ महिने)
किंवा
कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून (सार्वजनिक सुट्ट्या व साप्ताहीक
सुट्ट्या
वगळून) पुढील १२१ दिवसांकरिता बेरोजगार/ सहकारी सेवा
संस्थांकडून ४३
स्वयंसेवक पुरविणेबाबत सार्वजनिक वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर
दिलेल्या
सूचनेअंतर्गतचा अर्ज.

महोदय,

आमची संस्था संकेतस्थळावर दिलेल्या सूचनेअंतर्गत कीटकनाशक खात्याच्या कीटक नियंत्रण अधिकारी विभागाकरिता मनुष्यबळ पुरवू इच्छिते. तरी आम्हाला कृपया संधी मिळावी. संस्थेने आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती पुढीलप्रमाणे-

**अ) प्रशासकीय माहिती :-**

१) संस्थेचे नांव :- ____________________________________________

२) नोंदणी क्र. :- ____________________________________________

३) कार्यालयीन पत्ता :- ____________________________________________

४) पत्रव्यवहाराकरिता पत्ता :-________________________________________

५) संस्थेचे बँक खाते असलेल्या बँकेचे नांव :- _____________ खाते क्र. ____________

६) संस्थेचे पॅन कार्ड नं.:- ________________________________________

७) वेन्डर रजि. नं.:- ____________________________________________

८) संस्थेचे संपर्क दुरध्वनी क्र. निवास _______________ कार्यालय _______________

भ्रमणध्वनी ____________ फॅक्स ___________ ई-मेल आयडी ______________

| संस्था पदाधिकारी | संपूर्ण नांव | संस्थेच्या शिक्क्यासहित | निवासी पत्ता | दूरध्वनी/ भ्रमणध्वनी | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|

| | | **छायाचित्रे** | | **क्रमांक** | |
|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | | | | | |
| सचिव | | | | | |
| खजिनदार | | | | | |

९) संस्था पदाधिकारी माहिती

**(वास्तव्याचा पुरावा/कागदपत्रे जसे की, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, सरकारी, निमसरकारी यंत्रणेने दिलेली ओळखपत्रे)**

**ब) लेखा परिक्षण अहवाल :-** संस्थेचे अलिकडील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल वर्ष २०२२-२३, २०२३-२०२४

**क) कीटकनाशक कामाचा पुर्वीचा अनुभव :-**

______________________________________________________________________

______________________________________________________________________

________________________________

**ड) अन्य माहिती :-** संस्था सध्या म.न.पा.च्या इतर उपक्रमात सहभागी आहे काय? त्याचा तपशील, कार्यादेश, कामाचे स्थळ, कामाचा अवधी व त्यासंबंधीची माहिती.
(खोटी माहिती दिल्यास किंवा माहिती लपविल्यास संस्था कारवाईस पात्र राहिल)

| **उपक्रमाचा तपशील** | **कार्यादेश** | **कामाचे स्थळ** | **कामाचा अवधी** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**इ) महापालिकेच्या कोणत्याही कामामध्ये झालेल्या दंडात्मक कारवाईची माहिती :-**
(संस्थेचे पदाधिकारी व संस्था यांवर पुर्वी कारवाई झाली असल्यास त्याचा तपशील इ.)

---

---

---

**(असल्यास सर्व साक्षंकित कागदपत्रे सोबत सादर करावीत.)**

**फ)** संस्था किंवा संस्थेच्या पदाधिका-यांवर काही फौजदारी कार्यवाही झालेली असल्यास अथवा सुरु असल्यास त्याची माहिती पुढीलप्रमाणे,

---

---

आम्ही संस्थेचे पदाधिकारी म्हणून वर नमूद केलेली माहिती सत्य असुन त्यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास किंवा चुकीची माहिती दिल्यास आमची संस्था महापालिकेच्या कायदेशीर कारवाईस पात्र असेल, तसेच मनुष्यबळ पुरविण्याअंतर्गत म.न.पा. च्या नियम व अटी प्रमाणे तसेच विहित केलेल्या राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या किमान वेतन दराप्रमाणे काम करण्यास आम्ही बांधिल असुन, त्यामध्ये आमची संस्था भविष्यात कोणतीही तक्रार किंवा सबबी सांगुन कीटकनाशक फवारणीच्या कामात दुर्लक्ष अथवा निष्काळजीपणा करणार नाही, याची आम्ही संस्थेमार्फत हमी देत आहोत.
कृपया सादर.

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**

# <u>परिशिष्ट 'ड'</u>

## <u>हमीपत्र</u>

**(५००/- रुपये स्टॅम्प पेपरवर सादर करावे.)**

मी, श्री./श्रीमती . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . , - या संस्थेचा पदाधिकारी म्हणून या पदावर दि.................. पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमांप्रमाणे माझी सदर पदावर रितसर नियुक्ती झाली आहे. संस्थेचा नोंदणी क्रमांक दि.-- असा आहे. संस्थेच्या नियमानुसार / ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानुसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

- मुंबई महानगरपालिकेच्या कीटकनाशक खात्याच्या कीटक नियंत्रण एच / पूर्व विभाग येथे बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक व इतर कीटकनाशके फवारणीकरिता ०५ महिन्यांच्या कालावधीसाठी विभागात आवश्यक स्वयंसेवक उपलब्ध करुन देण्यासाठी विभागवार आवश्यक अतिरिक्त स्वयंसेवक उपलब्ध करुन देण्याचे काम आमच्या संस्थेला मिळण्यासाठी संकेतस्थळावर दिलेल्या सूचने अंतर्गत अर्ज केला असून अर्जात नमूद सर्व तपशील माझे माहितीनुसार योग्य व खरे आहेत.

- मी शपथपूर्व जाहीर करतो की आमच्या संस्थेचा उद्‌देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळवून देणे हा असून माझ्या संस्थेस कार्यादेश मिळाल्यास आम्ही नियमानुसार काम करण्याची हमी याव्दारे देतो.

- आम्हाला मिळालेला कार्यादेश संपूर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.

- अर्जात नमूद केलेल्या सर्व बाबी मी वाचल्या आहेत व त्या मला समजल्या आहेत. परिशिष्टातील अटी व शर्ती मला मान्य आहेत. मी असे जाहीर करतो / करते की अर्जात दिलेली माहिती माझ्या विश्वासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य असल्याचे दिसून आल्यास मी कायदेशीर कारवाईला पात्र असेन, तसेच संस्थेला मिळालेले काम / कार्यादेश त्यामुळे रद्‌द होऊ शकतो हे मला मान्य आहे.

स्वाक्षरी :--

नाव : --

पदनाम :

पत्ता : --

दिनांक : --

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**<u>कीटक नियंत्रण कार्यालय, पहिला मजला, बीएमसी लायब्ररी बिल्डिंग, विंडसर लेन, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ (पु), मुंबई ४०००९८.</u>**

क्रमांक : की.नि.अ/एच-पूर्व/ / लेखा दिनांक :

## <u>परिशिष्ट – 'इ'</u>

विषय : कीटकनाशक विभागाच्या कीटक नियंत्रण एच/पूर्व विभागात बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता ०५ महिन्यांच्या कालावधीसाठी स्वयंसेवक उपलब्ध करण्यासाठी वृत्तपत्र व मनपा संकेत स्थळावर जाहिरातीद्वारे अर्ज मागवून निवड करण्याबाबत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य खात्याच्या कीटकनाशक विभागाच्या की.नि.अ. एच/पूर्व विभागात ०५ महिन्यांकरीता बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणी मोहिम राबविण्यासाठी सार्वजनिक जाहिरातीद्वारे आणि संकेतस्थळावर दिलेल्या सूचने अतंर्गत प्राप्त झालेल्या पात्र अर्जांमधून विभागाकरीता सोडत काढून एका संस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे.

| | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** | |
|---|---|---|
| १ | कामाचा तपशील | कीटकनाशक विभागाच्या किटक नियंत्रण अधिकारी, एच/पूर्व विभाग येथे बांधकामाच्या ठिकाणी तसेच इतर ठिकाणी साठलेल्या पाण्यात अळीनाशक फवारणीकरिता ०५ महिन्यांच्या कालावधीसाठी की.नि.अ. एच/पूर्व विभागात आवश्यक स्वयंसेवक उपलब्ध करुन देणे. |
| २ | परिमाण | सोबत **परिशिष्ट 'अ'** जोडल्याप्रमाणे. |
| ३ | कराराचा कालावधी | मंजूरी सापेक्ष ०५ महिन्यांकरिता बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता |
| ४ | दर / किंमत | १) शासन धोरणानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील किमान वेतन दर(प्रतिदिन प्रती स्वयंसेवक) अधिक **<u>४९.५८%</u>** लेव्हीचे अधिदान परिपत्रक क्र.प्रकाअ/०९ दि.०२.०९.२०२० मधील अटींच्या पूर्ततेनंतर करणे.<br>२) सद्यःस्थितीत प्रमुख कामगार अधिकारी यांच्या परिपत्रक क्र.प्रकाअ/०२ दि.२३.०४.२०२५ अन्वये किमान वेतन दर रु.७९२.३० प्रतिदिन प्रति स्वयंसेवक असा आहे. |
| ५ | अटी व शर्ती | **अ) <u>अर्ज सादरीकरण</u> :**<br>१. अर्जदार संस्थेने परिशिष्ट 'फ' मध्ये नमूद केलेल्या अर्जाची रक्कम, कीटक नियंत्रण अधिकारी कार्यालयाद्वारे चलन प्राप्त करुन नागरी सुविधा केंद्रावर भरणा केल्यानंतर संस्थेच्या मुखपत्रावर (Letter Head) परिशिष्ट 'क' प्रमाणे मूळ प्रतीत कीटक नियंत्रण अधिकारी विभाग यांच्या सूचनापत्रामधील दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर अर्ज सादर करावा. सदर भरणा केलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. |

..०१

| | | |
|---|---|---|
| | | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** |
| ५ | **अटी व शर्ती** | २. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था ही दि. महाराष्ट्र को-ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० या कायदयाने स्थापन झालेली नोंदणीकृत संस्था (ज्या संस्थेचा उद्देश रोजगार मिळविणे आहे.)असल्याबाबतची उप निबंधक / सहायक निबंधक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. औद्योगिक उत्पादक संस्था ग्राहय धरण्यात येणार नाही.<br>३. अर्जदार सहकारी संस्था/ बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागात नेमून दिलेल्या कामाकरिता स्वयंसेवक पुरविण्याचा मागील सात वर्षात (माहे एप्रिल २०१९ नंतर) कमीत कमी दोन वर्षांचा अनुभव असलेल्या विविध खाते प्रमुखांच्या विविध कालावधींच्या साक्षांकित छायांकित प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल. त्यासोबत अनुभव दर्शविणा-या कार्यदेशांच्या साक्षांकित छायांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक असेल.<br>४. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे भविष्य निर्वाह निधी आणि संकिर्ण तरतूदी अधिनियम १९५२ कायदयाअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. तसेच पुरविण्यात येणा-या स्वयंसेवकांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबंधित शासकीय कार्यालयात वेळोवेळी जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.<br>५. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे राज्य कामगार विमा योजना (ई.एस.आय.सी. ॲक्ट १९४८) कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. तसेच पुरविण्यात येणा-या स्वयंसेवकांच्या बाबतीत या अधिनियमाखाली आवश्यक तो निधी संबंधित शासकीय कार्यालयात प्रत्येक महिन्यात जमा करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील व त्याच्या प्रतिपूर्तीसापेक्ष त्याचे अधिदान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.<br>६. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत कीटकनाशक हाताळणी करणे यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या कीटकनाशक कायदा १९६८ अधिनियम ४६ सोबत कीटकनाशक नियम १९७१ चा नियम १० अन्वये आवश्यक असणा-या वैध परवान्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक असेल.<br>७. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांची सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या दोन वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल ही परिशिष्ट 'फ' प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेच्या (किमान वेतन दर अधिक ४९.५८% लेव्ही) ३०% रकमेइतकी असणे आवश्यक आहे. सन २०२२-२३, २०२३-२४ या दोन आर्थिक वर्षांचे ताळेबंद अहवाल व वार्षिक उलाढालीबाबत सनदी लेखापालांच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक असेल. |

..०२

| | | |
|---|---|---|
| | | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** |
| ५ | अटी व शर्ती | ८. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्था परिशिष्ट 'फ' प्रमाणे देण्यात आलेल्या एकूण कंत्राट रकमेनुसार अधिकृत बँकेच्या आवश्यक पतपत्राची मूळ प्रत जोडणे आवश्यक असेल. अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून अगोदरच्या सहा महिन्यांच्या कालावधीतील पतपत्र (Letter of Solvency) वैध धरण्यात येईल.<br>९. अर्जदाराने शासनाच्या अधिकृत प्राधिकरणाने योग्य त्या नमुन्यात दिलेल्या वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्राची(GST Registration) साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे. संस्थेच्या एकूण उलाढालीनुसार संस्थेस वस्तू व सेवाकर नोंदणी करणे आवश्यक नसल्यास तसे प्रमाणपत्र संस्थेच्या मुखपृष्ठावर संस्थाचालकाने देणे बंधनकारक असेल.<br>१०. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना संस्थेच्या नावाचे पॅन कार्ड सोबत जोडणे आवश्यक असेल.<br>११. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचे आर्थिक व्यवहार असलेले बँकेचे नांव व खाते क्र.असलेल्या बँकेच्या खातेपुस्तिकेची साक्षांकित छायांकित प्रत देणे सोबत जोडणे आवश्यक असेल.<br>१२. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडे अर्ज सादर करताना परिशिष्ट 'ड' प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.५००/- किंमतीच्या मुद्रांकीत कागदपत्रावर (Stamp paper) हमी पत्र देणे आवश्यक असेल.<br>१३. अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची उपविधी / घटना याची साक्षांकित छायांकित प्रत देणे आवश्यक आहे.<br>**ब) <u>अर्ज पडताळणी</u> :**<br>१. अर्जदार संस्थांनी सूचनापत्र सार्वजनिक वृत्तपत्र व मनपा संकेत स्थळावर प्रकाशित केल्यापासून ०४ (चार) दिवसांच्या आत लेखी पत्राद्वारे सूचना कराव्यात. अर्जदार संस्थांनी केलेल्या केवळ लेखी सूचनांची दखल घेण्यात येईल.<br>२. ज्या अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना कीटकनाशक विभागाने यापूर्वी काळया यादीत टाकले असेल किंवा ज्या संस्थेचे काम समाधानकारक नाही म्हणून त्यांना काढून टाकले असेल अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.<br>३. एखाद्या संस्थेस आपल्या प्रतिस्पर्धी संस्थेबाबत त्याने कागदपत्रे/माहिती/किंवा सादर केलेल्या इतर कागदपत्रांबाबत तक्रार असल्यास त्यांच्या पडताळणीकरिता रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार फक्त) इतकी रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत अगोदर भरणा करणे आवश्यक आहे. जर सदर संस्थेने केलेली तक्रार असत्य व अयोग्य आढळल्यास सदर तक्रारदार संस्थेची रु.२५,०००/- परतावा रक्कम जप्त केली जाईल. तसेच जर तक्रार सत्य व योग्य असेल तर ज्या संस्थेबाबत तक्रार असेल त्या संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व रु.२५,०००/- दंड व ५ वर्षांकरिता काळया यादीत टाकले जाईल.<br>४. अर्जदार संस्थांनी सादर केलेली कागदपत्रे, पडताळणी अधिकारी / कर्मचारी आवश्यकता वाटल्यास त्याची शहानिशा करु शकतील. सदर कागदपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व रु.१०,०००/- इतका दंड व ५ वर्षांकरिता काळया यादीत टाकले जाईल. |

..०३

| | | |
|---|---|---|
| | | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** |
| ५ | अटी व शर्ती | ५. पडताळणी दरम्यान न जोडलेल्या आवश्यक कागदपत्रांची ई-मेलद्वारे दोन दिवसात पूर्तता करण्यास अर्जदार संस्थेस कळविले जाईल. पूर्तता न केल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत विहित मुदतीनंतर संस्थांची कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. अर्जदार संस्थेने सादर केलेली कागदपत्रे परत करण्यात येणार नाहीत.<br>६. पडताळणी दरम्यान संस्थाचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी पडताळणी कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याशी कसल्याही प्रकारे संपर्क साधू नये. तसेच कसल्याही प्रकारचे दबाव तंत्र वापरल्यास सदर संस्थेचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.<br>७. अर्जदार संस्थांच्या केवळ लेखी सूचनांची दखल घेण्यात येईल.<br>८. पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र ठरलेल्या संस्थांना ई-मेलद्वारे सोडतीचा दिनांक, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल. अपात्र संस्थांची यादी कीटक नियंत्रण अधिकारी यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.<br>**क) <u>संस्था निवडीकरीता अर्जांची सोडत</u> :**<br>१. सोडती दरम्यान, संस्थाचालक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. अधिकृत प्रतिनिधींकरिता संस्थाचालकांचे अधिकार पत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व अटी व शर्ती पूर्ण करणा-या पात्र अर्जदार संस्थांमधून सोडत काढण्यात येईल.<br>३. जर अर्ज प्राप्त झाले नसतील तर पुनश्चः सात दिवसांचा कालावधी देऊन सूचनापत्राद्वारे अर्ज मागविण्यात येतील. तरीदेखील प्रतिसाद न मिळाल्यास कीटक नियंत्रण अधिकारी विभाग हे सहायक आयुक्त विभाग , उप.आयुक्त परिमंडळ – ३ व अति.आयुक्त (प.उ.) यांच्या मंजुरी अन्वये त्या विभागातील परिरक्षण अथवा घनकचरा व्यवस्थापन खात्यातील कार्यरत स्वयंसेवक पुरविणा-या संस्थांकडून संमती पत्र घेऊन नेमणूक करतील.<br>**ड) <u>निवड पश्चात</u> :**<br>१. सोडतीमध्ये प्रथम क्रमांकावरील असलेल्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल. व्दितीय व तृतीय क्रमांकावरील संस्थांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात येईल.<br>२. निवड झालेल्या संस्थेने काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस संमती पत्र घेऊन नेमणूक करण्यात येईल.<br>३. व्दितीय क्रमांकाच्या संस्थेने सुध्दा काम करण्याचे नाकारल्यास सोडतीमधील प्रतिक्षा यादीवरील तृतीय क्रमांकाच्या संस्थेस संमती पत्र घेऊन नेमणूक करण्यात येईल.<br>४. एका संस्थेला नेमून दिलेले ठराविक काम ती संस्था दुस-या संस्थेला पुनर्वाटप करुन देऊ शकणार नाही. तसे केल्यास अशा संस्थेला महापालिकेतर्फे दिलेले कंत्राट त्वरित रद्द करण्यात येईल व त्या संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच प्रतिक्षा यादीवरील द्वितीय क्रमांकावर असलेल्या संस्थेची नेमणूक करण्यात येईल.<br>५. निवड झालेल्या संस्थेस आवश्यक ते विधी शुल्क, साधन साहित्य आकार आणि दस्तऐवजावर स्टॅम्प डयुटी, सुरक्षा अनामत रक्कम बँक हमीपत्राच्या स्वरुपात भरल्यास त्यावर स्टॅम्प डयुटी रक्कम व प्रसंगानुरुप जे-जे अनुज्ञेय असेल ते त्या-त्या वेळी अदा करणे बंधनकारक असेल. |

| | | मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे |
|---|---|---|
| ५ | अटी व शर्ती | ६. नियुक्त केलेल्या संस्थेने नियुक्ती दिनांकापासून ३० दिवसात करार रकमेच्या २% रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.<br>७. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने कार्यादेश प्राप्त झाल्यावर आवश्यक स्वयंसेवक पुरविताना ते स्वयंसेवक त्या संस्थेचे सभासद असल्याबाबतचे प्रमाणपत्र संस्थेच्या मुखपत्रावर (Letter Head) देणे बंधनकारक राहील. सदर सभासदांची संपूर्ण नावे, कायमचा पत्ता, छायाचित्र व बँक पासबुकची छायांकित प्रत कीटक नियंत्रण अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असेल.<br>८. नियुक्त अर्जदार सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने महापालिकेबरोबर महापालिका अधिनियम १८८८ कलम ७०(१)(ब) नुसार लिखित करार करणे बंधनकारक असेल. कराराबाबत भविष्यात काही वाद उदभवल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा मान. महानगरपालिका आयुक्तांचा असेल.<br>९. संस्थेची निवड झाल्यानंतर कंत्राट करार होण्यापूर्वी जर असे निदर्शनास आले की, संस्थेनी अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे ही खोटी किंवा चुकीची आहेत, तर सदर संस्थेस ५ वर्षांकरिता काळया यादीत टाकले जाईल व ते काम सोडतीमधील पुढील दुस-या क्रमांकाच्या संस्थेस देण्यात येईल. कंत्राट करार निष्पादित झाला असल्यास देखील सदर कंत्राट रद्द करण्यात येईल व वरील प्रमाणे कारवाई करण्यात येईल.<br>**ई) <u>सर्वसाधारण</u> :**<br>१. निवड झालेल्या अपंग सहकारी संस्थेकडून / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून कीटकनाशक फवारणीकरिता नेमण्यात आलेल्या प्रत्येक स्वयंसेवकास शासन निर्देशानुसार प्रमुख कामगार अधिकारी यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रक क्र.प्रकाअ/०९ दि.०२.०९.२०२० नुसार अनुज्ञेय किमान वेतन अधिक ४९.५८% लेव्हीचे अधिदान परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेसापेक्ष करावयाचे आहे.<br>२. ४९.५८% लेव्हीमध्ये भविष्य निर्वाह निधी १३%, कामगार विमा ३.२५%, सानुग्रह अनुदान ८.३३%, रजेचे रोखीकरण ६% व सणांच्या रजा व किरकोळ रजेचे रोखीकरण १%, उपदान ४%, प्रशासकीय खर्च ५% व घरभाडे भत्ता ५% तसेच सुरक्षितता साधने ४% या बाबींचा समावेश आहे.<br>३. निवड झालेल्या सहकारी संस्थेने / बेरोजगार सेवा सहकारी संस्थाचालकाने परिपूर्ण मासिक देयके प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कीटक नियंत्रण अधिकारी विभागात सादर करावीत. तसेच सदर संस्थाचालकाने महानगरपालिकेस सादर केलेल्या देयकांचे अधिदान मुंबई महानगरपालिकेकडून होण्यावर अवलंबून न राहता, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत कर्षित धनादेश / ECS /RTGS / NEFT द्वारे स्वयंसेवकांना पूर्ण अधिदान अदा करणे बंधनकारक आहे.<br>४. संस्थेच्या स्वयंसेवकांस देण्यात आलेल्या अधिदानाचा संबंधित बँक खात्यातील तक्ता, बँक पास बुकातील वेतनाच्या नोंदी किंवा प्रती महिन्याच्या २२ तारखेपर्यत नियुक्त संस्थेने कीटक नियंत्रण अधिका-यांना सादर करणे बंधनकारक राहील. तसेच त्याची योग्य ती शहानिशा किटक नियंत्रण अधिकारी यांनी पुढील महिन्याच्या देयकाच्या अधिदानापूर्वी करावी. स्वयंसेवकास केलेल्या अधिदानामध्ये त्रुटी आढळल्यास त्या संबधी कीटक नियंत्रण अधिकारी त्रुटी सुधारण्याकरीता संस्थाचालकाशी त्वरीत पत्रव्यवहार करतील. |

| | | मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे |
|---|---|---|
| ५ | अटी व शर्ती | ५. नियुक्त करण्यात आलेली सहकारी संस्था/बेरोजगार सेवा सहकारी संस्था, स्वयंसेवकांची उपस्थिती दररोज ठेवतील आणि महिना पूर्ण होताच प्रभाव्य अहवालासोबत देयक कीटक नियंत्रण अधिका-यांना सादर करतील. सदर देयक व प्रभाव्य अहवाल कीटक नियंत्रण अधिकारी पडताळून अधिदानाकरिता लेखा अधिकारी यांना सादर करतील.<br>६. निवड झालेल्या सहकारी संस्थेला/बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला त्यांच्या सदस्यास म्हणजेच स्वयंसेवकास, कायदयाप्रमाणे आजारपण/अपघात इत्यादीसाठी विमा संरक्षण नियमानुसार प्राप्त करुन देणे बंधनकारक असेल व ही संबंधित संस्थेची सर्वस्वी जबाबदारी असेल.<br>७. संबंधित सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे नियुक्त केलेल्या अर्जदार सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना बंधनकारक राहील.<br>८. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्यास ओळखपत्र देण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील याबाबत आवश्यक ती खातरजमा कीटक नियंत्रण अधिकारी करतील.<br>९. नियुक्त सहकारी संस्थेच्या / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सदस्याची वयोमर्यादा १८ वर्षा खालील नसावी.<br>१०. प्रत्येक ९० दिवसांच्या अखेरीस एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल. तसेच एका कॅलेंडर महिन्यातील रविवार व सार्वजनिक सुट्टी हे सुट्टीचे दिवस वगळून कामाचे दिवस २६ दिवसांपेक्षाअधिक होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल. सूचनापत्रातील नमूद कालावधी दरम्यान स्वयंसेवक पुरविलेल्या दिवसांकरिताच अधिदान करण्यात येईल. कार्यादेशात अथवा परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या एकूण दिवसांच्या कालावधीपेक्षा कमी दिवस भरल्यास संस्थांना उर्वरित दिवसांची भरपाई देण्यात येणार नाही किंवा कामाच्या कालावधी सुध्दा वाढवुन देण्यात येणार नाही.<br>११. बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणी करण्यासाठी फवारणी साधने व सुरक्षा साधने पुरविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.<br>१२. गणवेश परिधान केलेला, नियुक्त सहकारी संस्थेचा / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेचा स्वयंसेवक सकाळी ७.०० ते २.०० या कालावधीमध्ये ओळखपत्रासहीत, उपकरणे व साधनांसह उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याच्या जागी इतर कोणाचीही उपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही.<br>१३. रविवार व सार्वजनिक सुटटीच्या दिवशी आवश्यकता असल्यास काम करणे बंधनकारक आहे. कीटक नियंत्रण अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार, जादा कामाकरीता महानगरपालिकेतर्फे कोणतेही अतिरिक्त अनुदान / अधिदान मंजूर करण्यात येणार नाही.<br>१४. नियमित काम करणा-या महानगरपालिकेच्या कर्मचा-याप्रमाणे महापालिकेचे फायदे संस्थेच्या स्वयंसेवकास मिळणार नाहीत तसेच महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सामावून घेतले जाणार नाही.<br>१५. कोणतीही सूचना न देता संस्थेचे काम थांबविण्याचे अधिकार प्रशासनास असतील.<br>१६. नियुक्त संस्थेस काम बंद करावयाचे असेल तर त्यासंबंधित लेखी सूचना कीटक नियंत्रण अधिकारी यांना एक महिना अगोदर द्यावी लागेल. एखादया संस्थेने नियमानुसार काम सोडले तर त्या ठिकाणी प्रतिक्षा यादीवरील पुढील संस्थेची नेमणूक सहायक |

| | | |
|---|---|---|
| | | आयुक्त/परिमंडळीय उपायुक्त यांच्या मंजूरीनुसार करण्यात येईल. |

..०६

| | | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** |
|---|---|---|
| ५ | अटी व शर्ती | १७. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नेमून दिलेले काम प्रशासनास समाधानकारक होईल अशा प्रकारे पार पाडणे बंधनकारक राहील.<br>१८. नियुक्त केलेल्या संस्थांच्या स्वयंसेवकांनी समाधानकारक काम न केल्यास अथवा नियुक्त केलेल्या संस्थेने कराराप्रमाणे दायित्व पार न पाडल्यास सदर सहकारी सेवा संस्थेसोबत केलेला करार कोणतेही कारण न देता खंडीत / रद्द करण्यात येईल आणि या सहकारी सेवा संस्थेची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल व त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार द्वितीय अथवा तृतीय संस्था नियुक्त केली जाईल आणि त्याची संपूर्ण जोखीम आणि खर्च कसूरदार संस्थेकडून मनपा प्रणालीनुसार वसूल केला जाईल.<br>१९. नियुक्त संस्था पार पाडत असलेल्या कामाच्या संदर्भात संस्थेकडून अथवा संस्थेने |

| | | |
|---|---|---|
| | | नेमलेल्या स्वयंसेवकांकडून जर काही गैरवर्तणूक, नुकसान, महापालिकेच्या तसेच आम जनतेच्या मालमत्तेचे अपहरण अथवा हानी झाल्यास त्यास महापालिका प्रशासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार संस्थेची राहील. त्याचप्रमाणे दोषी स्वयंसेवकास त्वरित कामावरुन काढून टाकण्याची व पुढील कारवाई करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची असेल.<br>२०. करार कालावधीत नियुक्त संस्थांतर्फे दायित्व निभावणा-या स्वयंसेवकांकडून नेमून दिलेले काम पार पाडत असताना महापालिकेचा तोटा, हानी अथवा नुकसान होणार नाही याची हमी कराराचे दायित्व निभावणा-या नियुक्त संस्थेवर राहील. तथापी महापालिकेस काही हानी, तोटा अथवा नुकसान झाल्यास महापालिकेतर्फे कीटक नियंत्रण अधिकारी यांनी परिगणन केलेला नुकसानीचा खर्च हा अंतिम प्रमाण मानण्यात येईल व सदर परिगणन केलेला नुकसानीचा खर्च हा संबंधित नियुक्त संस्थेकडून वसूल करण्यात येईल.<br>२१. स्वयंसेवकांना पुरविण्यात आलेल्या कीटकनाशकांचा व संबंधित साधनांचा अपहार, गैरवापर किंवा अपव्यय स्वयंसेवकाने केल्याचे आढळल्यास त्याचे सभासदत्व रद्द करुन त्याला कामावरुन काढून टाकण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची असेल व अशा स्वयंसेवकास भविष्यात कोणत्याही विभागात कोणतेही काम सदर संस्थेमार्फत देण्यात येणार नाही ही खबरदारी संस्था घेईल.<br>२२. नियुक्त संस्थेच्या सभासदांना प्रचलित किमान वेतन दराने मासिक अधिदान व ४९.५८% लेव्ही याबाबतची जी देणी आहेत ती त्यांनी कामगार कायदयानुसार विहित वेळेत पूर्णपणे अदा करणे गरजेचे आहे. त्याकरिता संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. सदर देणी अपूर्ण अथवा कमी अदा केल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्त संस्थेस कोणतीही पूर्वसूचना न देता काळया यादीत टाकण्यात येईल.<br>२३. नियुक्त संस्थेचे चालक / पदाधिकारी हे महानगरपालिकेच्या कोणत्याही खात्यामध्ये कायम किंवा हंगामी पदाचे कर्तव्य पार पाडत असल्याचे आढळल्यास सदर संस्थेला देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल. महानगरपालिका नियमाअंतर्गत सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.<br>२४. अळीनाशक फवारणी ही सेवा 243W अन्वये 'निव्वळ सेवा' (Pure Services) असल्याने त्यांना वस्तू व सेवाकर लागू नाही. तथापि शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या वस्तू व सेवाकरासंदर्भातील निदेशानुसार अटी व शर्तींची पूर्तता करणे नियुक्त केलेल्या सहकारी संस्थेला / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला बंधनकारक राहील.<br>२५. नियुक्त संस्थेने सदर कामांबाबतच्या सूचनेतील नमूद अटी व शर्ती मान्य असल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर देणे क्रमप्राप्त असेल. |

..०स७

| | | |
|---|---|---|
| | | **मलेरिया/डेंग्यू नियंत्रण कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे** |
| ५ | अटी व शर्ती | **फ) <u>दंडात्मक कारवाई</u> :**<br>१. संस्थेचा सभासद/स्वयंसेवक सकाळी ७.०० वाजता कामावर वेळेवर हजर झाल्यास त्यास काम देण्यात येईल अन्यथा सहकारी संस्थेने त्याच्या जागेवर बदली स्वयंसेवकांमधून अन्य स्वयंसेवक उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील, अन्यथा सहकारी संस्थेस प्रतिदिनी प्रति स्वयंसेवक रु.१५०/- इतका दंड आकारण्यात येईल.<br>२. नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेल्या स्वयंसेवकांना कोणत्याही प्रकारे मोर्चा, आंदोलन, संप, दंगलीमध्ये तसेच राजकीय, इत्यादी कारणासाठी सहभागी होता येणार नाही. सदर संस्थेचे स्वयंसेवक अशाप्रकारे सहभागी झाल्याचे आढळल्यास त्यांच्या एक दिवसाच अधिदानाच्या सात पट रक्कम दंड म्हणून वसुल केली जाईल. त्याचप्रमाणे संबंधित |

संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल व त्यांना देऊ केलेले काम रद्द करण्यात येईल. तसेच सदर संस्थेचे चालक / पदाधिकारी यांच्या नावे अथवा त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावे कोणतीही संस्था असल्यास अथवा नवीन संस्था सुरु केल्यास अशा संस्थेला महानगरपालिकेतर्फे काम / कंत्राट देण्यात येणार नाही व दिले असल्यास त्वरित रद्द करण्यात येईल. सदर संस्थेच्या जागी द्वितीय क्रमांकाच्या संस्थेस काम देण्यात येईल.

३. नेमणुक झालेल्या संस्थेने सर्व स्वयंसेवकांना परिशिष्ट ‘ब’ अन्वये गॅलव्हनाईज्ड बादली, मॉप, सेफ्टी शूज,फेस मास्क, हेल्मेट व गणवेश पुरविणे बंधनकारक असेल व न पुरविल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अनु. क्र. | उपकरणे व सुरक्षा साधने | दंड (रू.) प्रति स्वयंसेवक प्रति दिन |
|---|---|---|
| १ | मॉप | २५/- |
| २ | फेस मास्क | २५/- |
| ३ | गॅलव्हनाईज्ड बादली | ५०/- |
| ४ | सेफ्टी शूज | ५०/- |
| ५ | हेल्मेट | ५०/- |
| ६ | गणवेश | १००/- |
| ७ | पंप | १००/ - |

४. स्वयंसेवकाचे अधिदान नियुक्त सहकारी संस्था / बेरोजगार सेवा सहकारी संस्थेने प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत अदा केले नाही तर रु. १०००/- इतका दंड संस्थेकडून आकारण्यात येईल व असे तीन वेळा घडल्यास सदर संस्थेस ३ वर्षाकरिता काळया यादीत टाकणे व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे इत्यादी शिक्षा देण्याची शिफारस संबंधित वरिष्ठांकडे करण्यात येईल व त्यानुसार पुढील कार्यालयीन कारवाई करण्यात येईल.

५. नेमणुक झालेल्या संस्थांनी सर्व स्वयंसेवकांना मासिक अधिदान प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत कर्षित धनादेश / ECS /RTGS / NEFT द्वारे न केल्यास सदर संस्थेला रू.२०००/- दंड आकारण्यात येईल.

६. नेमणुक झालेल्या संस्थांनी सर्व स्वयंसेवकांना ओळखपत्र न दिल्यास प्रत्येक स्वयंसेवकामागे रु.५०/- इतका दंड आकारण्यात येईल.

..०८

## बृहन्मुंबई महानगरपालिका

**कीटक नियंत्रण कार्यालय, पहिला मजला, बीएमसी लायब्ररी बिल्डिंग, विंडसर लेन, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रूझ (पु), मुंबई ४०००९८.**

### परिशिष्ट - 'फ'

विषय : कीटकनाशक विभागाच्या कीटक नियंत्रण अधिकारी विभागात बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशक फवारणीकरिता ०५ महिन्यांच्या कालावधीसाठी व डेंगी, मलेरिया नियंत्रणाकरिता स्वयंसेवक उपलब्ध करण्यासाठी वृत्तपत्र व मनपा संकेत स्थळावर जाहिरातीद्वारे अर्ज मागवून निवड करण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. सीए/एफआरजी/०९ दिनांक ०४.१०.२०२४

| अनु. क्र. | विभाग | आवश्यक स्वयंसेवक (०५ महिने) | एकूण कंत्राट रक्कम (५ महिने ) | अर्जाची रक्कम +(९% SGST + ९% CGST) = एकूण रक्कम(रु.) | पतपत्र रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एच/पूर्व | ४३ | **६४,७४,५२१/-** | १३,२००+१,१८८+१,१८८= १५,५७६/- | १५ लाख |

**सही/-**

**कीटक नियंत्रण अधिकारी**

**एच/पूर्व विभाग**